# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २६/०३/२०२५ ( बुधवार ) दुपार**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १ आरोपी अटक, उमरेड पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन उमरेड**:—दिनांक २५/०३/२०२५ रोजी उमरेड पोलीस , पोलीस स्टेशन हददीत अवैध धंदयांवर कारवाई करणे कामी रात्री पेट्रोलींग करीत असतांना एक टिप्पर भिवापुर कडुन नागपुर कडे भरधाव वेगाने जात असतांना दिसला. पोलीसांना सदर टिप्पर संशयीत वाटल्याने त्यांनी सदर टिप्परचा पाठलाग करून टिप्पर ला उमरेड ते नागपुर हायवे रोड वर इंडीयन ऑईल पेट्रोलपंप जवळ थांबविले. सदर टिप्पर हा भारत बेन्झ कंपनीचा टिप्पर क्रमांक एम.एच ४९ बी.झेड १७१७ असा दिसुन आला. टिप्पर चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता **राहुल रमेश खेरवार,वय २७ वर्षे, पत्ता. सेनापती नगर,दिघोरी घाट उमरेड रोड, हुडकेश्वर खुर्द,नागपुर अशी माहीती प्राप्त झाली.** वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर रेतीची अवैध वाहतुक **टिप्पर मालक कल्लु खान,वय ४५ वर्षे,रा खरबी नागपुर** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** वाहना मधुन ९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये आणि **२) वाहन —** भारत बेंन्झ कंपनीचा टिप्पर क्रमांक एम.एच ४९ बी.झेड १७१७ किंमती ४०,००,०००/— रूपये **असा एकुण ४०,४५,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**टिप्पर चालक आरोपी नामे राहुल रमेश खेरवार,वय २७ वर्षे, पत्ता. सेनापती नगर,दिघोरी घाट उमरेड रोड, हुडकेश्वर खुर्द,नागपुर आणि टिप्पर मालक कल्लु खान,वय ४५ वर्षे,रा खरबी नागपुर यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज**

अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम ,सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.गुन्हयाचा पुढील तपास उमरेड पोलीस करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर